# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक २३ डिसेंबर, २०१४.

मुंबई, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये मुंबई विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आलेल्या विविध परिक्षांमध्ये यश संपादीत केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मंगळवार दिनांक २३ डिसेंबर, २०१४ पदवीदान सभागृह (सर कावसजी सभागृह) येथे पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. नरेशचंद्र यांनी केले.

ललित कला, विज्ञान विद्याशाखा यांमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे नावांचे वाचन विज्ञान शाखा अधिष्ठाता डॉ. माधुरी पेजावर यांनी केले व या सर्व विद्यार्थ्यांना कुलगुरु डॉ. राजन वेळूकर यांच्या हस्ते पुष्प व प्रमाणपत्र देण्यात आले.

विधी, वाणिज्य व कला विद्याशाखेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांच्या नावाचे वाचन वाणिज्य विद्याशाखा अधिष्ठाता डॉ.मधू नायर यांनी केले व या सर्व विद्यार्थ्यांना कुलगुरु डॉ.राजन वेळूकर यांच्या हस्ते पुष्प व प्रमाणपत्र देण्यात आले.

तंत्रज्ञान विद्याशाखेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांच्या नावाचे वाचन तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ.सुरेश उकरंडे यांनी केले व या सर्व विद्यार्थ्यांना कुलगुरु डॉ.राजन वेळूकर यांच्या हस्ते पुष्प व प्रमाणपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमास मार्गदर्शनपर विचार व्यक्त करताना कुलगुरु डॉ. राजन वेळूकर यांनी पेशावर येथील आर्मिस्कूलवर झालेल्या दुर्दैवी हल्ल्याबाबत शोक व्यक्त केला. आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आहे व त्यामुळे विद्यार्थ्यांनी बदलत्या कालानुरुप सुसंगत राहिले पाहिजे, असे सांगितले. तसेच, विद्यापीठातील व्हर्च्युअल क्लासरुम, नॅनोटेक्नॉलॉजी, कन्व्हेंशनल सेंटर, इतर विद्यापीठाशी करार आणि दिनांक ३ ते ७ जानेवारी, २०१५ ला होवू घातलेल्या १०२ वी इंडियन सायन्स कॉंग्रेस या विद्यापीठातील विविध उपक्रमांचा उल्लेख केला. तसेच, विद्यार्थ्यांना भविष्यातील त्यांच्या घोडदौडीविषयी शुभेच्छा दिल्या व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी इंडियन सायन्स कॉंग्रेसमध्ये सहभागी होण्याचे आव्हान केले.

..२/-

| Sr. | Faculty | Number of Student | Course/Subject | |
|---|---|---|---|---|
| 1. | Applied Arts | 14 | | |
| 2. | Law | 10 | LLM | 07 |
| | | | LLM | 03 |
| | | | **Total** | **10** |
| 3. | Technology | 44 | Engineering | 35 |
| | | | M.C.A. | 03 |
| | | | B.Arch. | 03 |
| | | | B. Pharm. | 03 |
| | | | **Total** | **44** |
| 4. | B.Sc. | 53 | B.Sc. | 47 |
| | | | M.Sc. | 03 |
| | | | B.Sc.I.T. | 03 |
| | | | **Total** | **53** |
| 5. | B.A. | 89 | T.Y.B.A. | 71 |
| | | | M.A. | 03 |
| | | | B.Ed. | 03 |
| | | | B.Lib | 03 |
| | | | M.Lib. | 03 |
| | | | B.M.M. | 06 |
| | | | **Total** | **89** |
| 6. | B.Com. | 73 | T.Y.B.Com. | 67 |
| | | | M.Com. | 03 |
| | | | M.M.S. | 03 |
| | | | **Total** | **73** |

या कार्यक्रमास कुलसचिव डॉ.एम.ए.खान व वित्त व लेखा अधिकारी अशोक फळणीकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालक डॉ. स्नेहा देऊलकर यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. अशोक फर्डे उप कुलसचिव यांनी केले.

लिलाधर बन्सोड
उप कुलसचिव (जनसंपर्क)